# रंगांचे अर्थ



विनिता कुरे
saptahiksakal@esakal.com



**घर सजवताना 'रंग' खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. घराच्या सजावटीमध्ये रंगांचा वापर वेगवेगळ्या पद्धतीने आणि कल्पकतेने केला जातो. रंगांमधून व्यक्त होणाऱ्या कल्पना, रंगांचे वेगवेगळे अर्थ उलगडून दाखवणारा हा लेख...**

थंडी संपून उन्हाळ्याच्या झळा आता चांगल्याच जाणवून लागल्या आहेत व सोबतच होळी, धूलिवंदन व रंगपंचमीच्या सणांची आरोळी पण दुमदुमणार आहे. भारतीय संस्कृतीमध्ये रंगपंचमीचे महत्त्व आपण सर्व जाणतोच. लहान मुलांमध्ये तसेच मोठ्यांमध्येही हा सण उत्साहाने, जल्लोषात रंगांची उधळण करून साजरा केला जातो. आता तर 'इको फ्रेंडली, नॅचरल' रंगांची खूपच धूम आहे.

ज्या प्रकारे रंगपंचमी आपल्या आयुष्यात, मित्रमैत्रिणींमध्ये नवचैतन्य, उत्साह, जोष घेऊन येते त्याचप्रमाणे 'रंग' हे अंतर्गत सजावटीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. रंगांशिवाय त्यात 'स्पाईस'च राहणार नाही. अतिशय नीरस, कंटाळवाणे व तोच तोच पणाचा अतिरेक होईल; हाच तडका रंगांच्या साह्याने आपण सहजतेने देऊ शकतो. अगदी कालपरवापर्यंत रंगसंगतीचे ठोकताळे खूपच तेच ते होते.

अगदी थोड्या वर्षांपर्यंत डिझाइनमध्ये रंगाचा सहभाग खूपच मर्यादित व ठराविक पद्धतीनेच होत असे. परंतु, आता सारीच समीकरणे बदललेली आहेत. नवनवीन स्टाइल्स, ट्रेंड्स व ट्विस्टने अतिशय चांगले, स्टनिंग इफेक्ट्स अनुभवायला मिळतात. प्रत्येक जागा (स्पेस) ही एक प्रत्येकाची आयडेंटी, टेस्ट, डिझाइन व पर्सनल ओळख देते. रंगाचे तंत्रज्ञानही खूप विकसित झाले आहे. जेणेकरून आपण अपेक्षित परिणाम साधू शकतो.

रंगाचा उपयोग आम्ही डिझायनर लोक विविध मूड, एखादे स्टेटमेंट साधण्यासाठी करतो. रंगांमुळे एखादी कल्पना (थीम), एखादे अभिव्यक्ती (Expression) हायलाइट करण्यासाठी मदत होते. यातूनच आपण पर्यावरणाला प्रतिसादही देत असतो.

आज-कालची आपली धावपळीची जीवनशैली रिलॅक्स करण्यासाठी आपण रंगांच्या सहायाने काही ट्रिक्स वापरू शकतो. पिवळा रंग हा आनंदवर्धक, फ्रेशनेस देतो. निसर्ग (नेचर) हे अत्यंत मस्त उदाहरण आहे, ज्यातून आपण विविध रंगांची उधळण एकाच वेळेस, वेगवेगळ्या ऋतूंमधून तर वेगवेगळ्या वेळांमधून घेऊ शकतो. पण हेच रंग खूपच काळजीपूर्वक वापरण्याची जबाबदारी आमच्यावर असते. जेणेकरून त्यामधील सांगड व अपेक्षित परिणाम एखाद्या प्रोजेक्टला वेगळ्याच उंचीवर नेवून ठेवतात. उदा. एखाद्या दवाखान्यासाठी उष्ण रंगसंगती वापरली तर अपेक्षित परिणाम चांगला मिळणार नाही, पण ह्याच ठिकाणी जर मंद रंगसंगती वापरली तर पेशंट लवकर बरे होण्यास मदत होऊ शकते. प्रत्येक ठिकाणी उपलब्ध जागा, उपलब्ध नॅचरल व आर्टिफिशियल लाइट्स, फर्निचरची प्लेसमेंट व जागेचे प्रपोर्शनर्स, यावरही भरपूर अवलंबून असते.

काही रंग एकमेकांसोबत अधिक खुलून दिसतात, तर काही एकटे! कलर थेअरी विविध संकल्पना, डिझाइन अनुप्रयोग

(applications) व विविध व्याख्यांना समाविष्ट करते. त्यातल्या त्यात कलर थेअरीचे तीन प्रकार आहेत. जे लॉजिकल व उपयोगी आहेत. कलर व्हील, कलर हार्मोनी (Harmony) व कशा प्रकारे आपण रंग वापरतो! हे तीन बेसिक नियम डिझाइनमध्ये कलर सिलेक्शनसाठी व रंगसंगतीमध्ये प्रामुख्याने वापरले जातात.

काही वर्षांपासून एक भिंत डार्क रंगवण्याचा, त्यावर विविध टेक्चर करण्याचा ट्रेंड आहे. यामध्ये डिझाइन थीम, कलर थीमचा विचार करायलाच हवा. यामध्ये डार्क निळ्या सोबत लाईट, ब्राईट पिवळा, सोनेरी, कॉपर, ब्रासचा वापर होऊ शकतो. याबरोबर लाल, नारिंगीचाही वापर होऊ शकतो. याचबरोबर नॅचरल वुड कलर बरोबर वापरले तर वॉर्म ॲटमॉस्फियर तयार करू शकतो. मेडिहेरिन ब्लूने आनंददायी वातावरण निर्मिती करता येऊ शकते. याचबरोबर व्हाईट लाईट विनिअर वा लॅमिनेट वापरले तर सुंदर, आकर्षक अंतर्गत सजावट निर्मिती होऊ शकते.

बर्न्ट ऑरेंज व ॲक्वामरीन ब्लूने कॉन्ट्रास्ट साधला जाऊ शकतो. पेस्टल कलर्सनेसुद्धा छान रंगसंगती साधली जाऊ शकते. याबरोबर पांढरा छान टीम होऊ शकते. पेस्टल कलर्सबरोबर काळ्या/ करड्या रंगाची रंगसंगती घेऊन समकालीन (contempory) इफेक्ट साधला जाऊ शकतो. अर्थी (Earthy) लाल व वुडन टोनमुळे उष्ण रंगसंगतीचा इफेक्ट मिळवला जाऊ शकतो. लाल व ऑरेंज/ नारिंगी आपली प्रथा, परंपरा सांगतात व त्याचवेळी समकालीन (contempory) फील देतात. नारिंगी बरोबर तुम्ही ग्रे, काळा व नॅचरल कलर्स टीम अप करू शकतात. ब्रिक रेड, नारिंगी, वाईन कलरने आपण वेलकमिंग लूक मिळवू शकतो, पण त्याचा अति प्रमाणातला वापर घातक ठरू शकतो; यासाठी योग्य रंगाचा वापर योग्य ठिकाणी व योग्य प्रमाणातच व्हायला हवा.

नैसर्गिक छटा या काही अंतर्गत सजावटीमध्ये नवीन नाही. यामुळे कुल इफेक्ट साधला जातो. पांढरा ऑफव्हाइट, बेज रंगाची चांगली बॅकग्राउंड म्हणून वापर होऊ शकतो. तेव्हा आपण उठावदार पडदे, आर्टिफॅक्ट्स, विविध




वुडन फिनिशेसचा वापर करून उठावदार अंतर्गत सजावट करू शकतो. या सोबत आपण सोनेरी रंगाचीसुद्धा थीम करू शकतो. पण त्याचा वापर अतिशय कमी प्रमाणात, योग्य ठिकाणी मिळू शकतात. ज्यामुळे आपण इंटिरियरमध्ये ग्लॅमरचा टच देऊ शकतो.

या सर्वांसोबत आपण व्हायब्रंट पिंक (गुलाबी), पिवळा, निळा, हिरवा यांचाही वापर खूपच इफेक्टिवली करू शकतो. आज-काल कमर्शिअल व ऑफिस इंटेरिअरमध्येही रंगसंगतीचा खूपच वापर होतोय, जेणेकरून त्या जागेला एक कॅरेक्टर पण मिळते. आज-काल ऑफिस कल्चरमध्येही याचा वापर प्रामुख्याने होताना दिसतोय.

बदलती जीवनशैली, वाढते कामाचे तास, स्ट्रेस फॅक्टर - कामामुळे, नातेसंबंधामुळे ही गरज निर्माण झाली आहे. तसेच ऑफिसमधील वातावरण हलकेफुलके ठेवण्यास तसेच एखाद्या ऑफिसचे ऑफिस कल्चर त्याच्या क्लाएंटला सांगण्यासाठी रंगसंगती खूप महत्त्वाची भूमिका निभावते.

हे सर्व झाले अंतर्गत सजावटीमध्ये! इमारतींना बाहेरून रंगवायच्या पद्धती, ट्रेंड्समध्ये खूपच नवनवीन संकल्पना राबवण्यात येतात. हल्ली वेगवेगळ्या रंगांच्या कंपन्यांनीही या दोन्ही सेक्टरमध्ये खूपच सुधारणा, संकल्पना राबवण्याचे धोरण चालू केले आहेत. बाजारात त्यांचे विविध ॲप्सही उपलब्धही आहेत.

याच रंगसंगतीच्या पुढचा एक टप्पा आपण सर्व जण अनुभवतो आहोत. सध्या स्ट्रीट आर्ट ही नवीन संकल्पना हल्ली आपल्या भारतातही राबवली जात आहे. ज्याचा मूळ उद्देश ग्राफिटीला, भारतीय संस्कृती व त्याचबरोबर कलाकारांना एक नवीन प्लॅटफॉर्म मिळून आर्ट संस्कृतीलाही प्रोत्साहन देणे व शहरांचे सुशोभिकरण हाही आहे. जेणेकरून रस्त्यांचे पब्लिक प्लेसेस जास्तीत इंटरॲक्टिव, सुंदर, कलरफुल, आनंददायी बनून आपले जीवन आनंदमय होऊन जाईल. याच अंतर्गत बोरिवली स्टेशनचे, पुणे स्टेशनचे सुशोभीकरण येते नाही का?

यामध्ये खूपच पुसटशी रेषा आहे. आपली अंतर्गत सजावटही. ही बाह्य सजावटीमध्ये पूर्णपणे मिसळून गेली आहे.

ठराविक ठोकताळे, नियम, घिसेपीट्या रंगसंगती यांना आपण कधीच सोडचिठ्ठी दिली आहे. नवनवीन कल्पना, अभिव्यक्ती (expressions), ॲक्सेसराइझन, पॅटर्नस, टेक्शर्स याने समृद्ध स्पेस आम्ही निर्माण करतो. ज्यामध्ये रंगसंगती महत्त्वाची भूमिका निभावते.

चला तर मग रंगसंगतीच्या आनंददायी यात्रेत परंपरेला जपत आपण सर्व विविध रंगात न्हाऊन निघूयात!!!